# पहचान

“हा मयूरीचा डावा हात, ही कमूआजीची पाठ, हा चिनूचा पाय आणि...”

लग्नाच्या फोटोतल्या घोळक्यातून नातेवाईक ओळखायचा खेळ चालला होता. अंतरपाटाभोवतालच्या त्या गर्दीत फारसे कुणाचे चेहरे दिसतच नव्हते. पण तरीही ओळख-परेड झपाट्याने चालली होती.

दूरच्या जथ्यातला पाठमोरा मित्रही आपल्याला सहज ओळखता येतो. ओळख पटवायला चेहऱ्याची गरज असते का?

गेल्याच वर्षी अमेरिकेतल्या तीन विद्यापिठांच्या मानसशास्त्रविभागांनी त्या विषयावर एकत्रित आणि व्यापक संशोधन केलं. त्याच्यात सहभागी झालेल्यांना गर्दीतून आणि वेगवेगळ्या फोटोंमधून एकच विशिष्ट माणूस ओळखायचं काम करावं लागलं. त्या फोटोंमध्ये त्या व्यक्तीचा चेहरा मुद्दाम अस्पष्ट ठेवला होता. तरीही लोकांना ती व्यक्ती बिनचूक ओळखता आली. एक खास यंत्र वापरून फोटोकडे बघतानाच्या त्यांच्या नजरेचा माग काढला गेला. त्यातून कळलं की बहुतेक माणसं फोटोतल्या व्यक्तीच्या चेहऱ्याकडे न बघता तिच्या शरीरयष्टीकडे आणि देहबोलीकडेच बघत होती. पण त्यांना स्वतःला त्याची जाणीवही नव्हती! त्यांच्या मते त्यांनी त्या व्यक्तीचा चेहराच ओळखला होता!

हे संशोधन झालं ते पोलीसखात्याच्या ओळख-परेडला मदत व्हावी म्हणून! पण त्याच्यावरून रोजच्या व्यवहारासाठीही एक महत्त्वाचा कानमंत्र मिळतो. व्यक्तीची ओळख तिच्या चेहऱ्यापेक्षाही तिच्या देहबोलीवर किंवा व्यक्तिमत्त्वावर अधिक अवलंबून असते.

ह्या तत्त्वाचा जीवनात पदोपदी अनुभव येतच असतो. पण आपलं मन त्याची नोंद घेत नाही. आर्मीच्या गणवेशातल्या धिप्पाड, ताठ ऑफिसरची समोरच्यावर पटकन छाप पडते. अस्ताव्यस्त कपड्यांतला मरगळलेला माणूस कितीही देखणा असला तरी मनात भरत नाही.

समोरच्याच्या मनातल्या दृश्य प्रतिमेत चेहऱ्यापेक्षाही थाटमाट-ताठपणा महत्त्वाचा असतो. पण आयुष्यात तर त्याच्याही पुढे जाऊन माणसाची एक सर्वांगीण प्रतिमाच समोरच्याच्या मनात ठसते. तिच्यात बुध्दिमत्ता, समंजसपणा, आत्मविश्वास वगैरे वागणुकीतल्या पैलूंचाही वाटा मोठा असतो.

एखादी स्त्री प्रथमदर्शनी अगदी कुरूप वाटते. पण सहवासाने तिचे सद्गुण  समजत गेले की ती अधिकाधिक आकर्षक दिसायला लागते; कधीकधी तर ती सुंदरही वाटते! त्याउलट पहिल्या भेटीत मोहून टाकणारी एखादी रूपगर्विता दुर्गुणी असली तर हळूहळू तिच्या रूपाचा तिटकारा यायला लागतो.

अ‍ॅन्टनीची बायको ऑक्टेव्हिया ही क्लीओपात्राहून कित्येक पटींनी अधिक रूपवती होती अशी इतिहासात नोंद आहे. पण क्लीओपात्राचं वागणं-बोलणं-वावरणं इतकं आकर्षक होतं की अ‍ॅन्टनीने आपला जीव तिच्यावरून ओवाळून टाकला! इतिहासावरही क्लीओपात्राचा असा प्रभाव पडला की 'एक असामान्य सौंदर्यखनी' ही तिची ऐतिहासिक ओळख बनून राहिली.

आयुष्याचा जोडीदार निवडताना ज्ञान, वैचारिक पातळी आणि तडजोडीची कुवत यांना रूपापेक्षा अधिक महत्त्व दिलं तर मनाजोगी सखी मिळते. सहवासाने तिची छबी अधिकच आवडत जाते; वार्धक्यात तर ती 'आँखोंका तारा' बनते.

'दैवायत्तं सुस्वरूपं मदायत्तं तु वर्तनम्। हे ब्रीदवाक्य जपणं ही चिरंतन सौंदर्याची गुरुकिल्लीच आहे.

डॉ. उज्ज्वला दळवी

-ujjwalahd9@gmail.com

(पूर्वप्रसिध्दी : 'मुंबई सकाळ')